# अमृतवाहिनी अभियांत्रिकीच्या ''मेधा'' नियतकालिकास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पुरस्कार

संगमनेर ता. १४/०८/२०१७. (प्रतिनिधी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांनी सन २०१५-१६ मध्ये प्रकाशित केलेल्या नियत-कालिकांची स्पर्धा विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती.

**"मेधा मध्ये नाविण्यता"** कुलगुरु डॉ. करमळकर

मेधा या नियतकालिकामध्ये नाविण्यता असून पुढील वाटचालीत डॉ. कळमकर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी ट्रॉफी, प्रशस्तीपत्रक व सहा हजार रुपयांचे पारितोषिक अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या टीमने स्विकारले.

अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या **''मेधा''** या नियतकालिकास व्यावसायिक विभागातून अहमदनगर विभागस्तरावरील व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक जाहिर झाले. शनिवार दिनांक- १२/०८/२०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचा पारितोषिक वितरण समारंभ विद्यापीठातील संत नामदेव सभागृहामध्ये संपन्न झाला. यावेळी सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला. अमृतवाहिनी सदैव विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी ज्ञानाबरोबरच कलागुनांना वाव मिळावा यादृष्टीने वेगवेगळे व्यासपीठ तयार करुन देत असते. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांमध्ये लेखन, वाचन तसेच साहित्याची आवड निर्माण होण्यासाठी व महाविद्यालयामध्ये वर्षभरात होणारे वेगवेगळे कार्यक्रम एका ठिकाणी संचित होण्याच्या दृष्टीने ''मेधा'' हे वार्षीक नियतकालीक सुरु केलेले आहे. या पहिल्याच वैविध्यपूर्ण नियतकालीकास विद्यापीठाकडून गौरविण्यात आले आहे. नाशिक व अहमदनगर जिल्ह्यामधील अभियांत्रिकी महाविद्यालयांपैकी अमृतवाहिनी या एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालयास सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्याबरोबरच अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या सर्व शाळा व महाविद्यालये एकत्रितपणे गेल्या २ वर्षांपासून मेधा या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करतात.

या समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, कुलसचिव डॉ. अरविंद शाळीग्राम, परिक्षा विभाग प्रमुख डॉ. अशोक चव्हाण, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सदर पुरस्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, उपप्राचार्य प्रा. अे.के.मिश्रा, रजिस्ट्रार प्रा. व्ही.पी.वाघे, मेधा नियतकालिकाचे संपादक प्रा. सुदीप हासे व विद्यार्थी प्रतिनिधी यांनी मान्यवरांच्या हस्ते स्विकारला.

विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी मेधा नियतकालिकाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. वर्षभर चाललेल्या या प्रक्रियेमध्ये सुदीप हासे, सौ. धनवंती ताजणे, हेमंत पठाडे, सचिन खर्डे, अरुण कचरे, सुजीत चौधरी, विक्रम अभंग, विजय कुमार, महेंद्र डोंगरे, अमृता लगे या सर्व प्राध्यापक वर्ग व विभाग प्रमुख यांनी मोलाचे सहकार्य केले. वर्षभर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट साहित्य दिले. सामाजिक, ग्रामिण, प्रेरणात्मक लेख, कथा, कविता, चारोळ्यांचे लेखन केले. हे सर्व लेखन वेगवेगळ्या पातळीवर तपासण्यात आले आणि नंतर डिझाईन पूर्ण करण्यात आली. विद्यार्थी प्रतिनिधी राहुल मगर, कुलदीप ऊगले, दिपीका वर्पे, किरण भांड, रोहिणी नेहे, राहुल वाळुंज, सागर उमरे, शितल गलांडे, स्नेहल गवांदे, झैदी झैनाब, प्रणिता शिंदे, देवयानी पाटील व अक्षदा गुंजाळ यांनी उत्कृष्ट सहकार्य केले व प्रकाशनात मोलाचा वाटा उचलला.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी महसुलमंत्री आमदार बाळासाहेब थोरात, विश्वस्त आमदार डॉ. सुधीरजी तांबे, सौ. शरयुताई देशमुख यांनी मेधाचे संपादक सुदीप हासे, त्यांची टीम, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. एम.ए.व्यंकटेश, उपप्राचार्य प्रा. अे.के.मिश्रा, रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे, अधिष्ठाता डॉ. एम. आर.वाकचौरे, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

* * *

(कृ. मागे पहा. . . .फोटो)



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे वतीने ''मेधा' नियतकालिकास भेटलेला पुरस्कार कुलसचिव डॉ. अरविंद शाळीग्राम, परिक्षा विभाग प्रमुख डॉ. अशोक चव्हाण, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांचे हस्ते स्विकारतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, उपप्राचार्य प्रा. अे. के. मिश्रा, रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे, संपादक प्रा. सुदीप हासे, विद्यार्थी प्रतिनिधी राहुल मगर व कुलदीप ऊगले.